# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : महानिर्मिती/सांनिसु/जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/६६/ दिनांक : ०८/०५/२०१५.

## निवेदन

### महानिर्मितीचा वीज दर रास्त
### वीज संच बंद करण्याची महावितरणची मागणी - त्यासंबंधी महानिर्मितीची बाजू

**दि. ०८/०५/२०१५ (मुंबई) :** दि. ७ व ८ मे २०१५ रोजी राज्यातील काही प्रसारमाध्यमांमध्ये महानिर्मितीचे खर्चिक संच बंद करणार अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झालेले आहे. सदर वृत्तामध्ये ग्राहकहिताच्या दृष्टिकोनातून महानिर्मितीचे खर्चिक संच बंद करण्याची विनंती महावितरणने वीज नियामक आयोगाला केली आहे, असे नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर महानिर्मितीतर्फे खालीलप्रमाणे निवेदन देण्यात येत आहे :

- महानिर्मितीच्या मध्यावधी अवलोकन याचिकेवर (प्रकरण क्र. १५/२०१५) महावितरणने दि. २०/०४/२०१५ रोजी राज्य वीज नियामक आयोगाकडे शपथपत्र दाखल केले असल्याने व त्यानंतर वीज नियामक आयोगाने महानिर्मितीला त्याबाबतचे स्पष्टीकरण दाखल करण्यास सांगितल्याने महानिर्मितीने आज दिनांक ०८/०५/२०१५ रोजी शपथपत्र दाखल केलेले आहे.
- महावितरणने यासंबंधित केलेल्या याचिकेतील **जास्त खर्चाचे महानिर्मितीचे वीज संच बंद करणे. तसेच महानिर्मितीला आवश्यक महसुलापैकी रु. ५००० कोटी इतकी रक्कम आयोगाकडे नियामक मालमत्ता (Regulatory Asset) म्हणून राखून ठेवणे व कामगिरीतील सुधारणांवरुन त्याबाबत निर्णय घेण्याची आयोगाला विनंती करणे** या बाबींवर महानिर्मितीने आजच्या शपथपत्रात आपली बाजू मांडलेली आहे.
- महावितरणकडून वीजबिलाच्या थकबाकीपोटी महानिर्मितीला येणे असलेली अंदाजे रक्कम रु. ६००० कोटी इतकी प्रचंड असताना महावितरणकडून मात्र विलंबाने व अंशतः रक्कमच प्राप्त होत आहे. खेळत्या भांडवलासाठी वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या अतिरिक्त कर्जावरील व्याजापोटी महानिर्मिती आर्थिक संकटात सापडली असून महानिर्मितीच्या कामगिरीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.
- महानिर्मिती ही प्रथमपासून तिची १००% वीज महावितरणला देत असते. सद्यः परिस्थितीत महावितरणच्या एकूण वीज खरेदीपैकी सुमारे ४०% वीज महानिर्मितीकडून करण्यात येते. याबाबत कायदेशीर दीर्घकालीन वीज खरेदी करार अस्तित्वात आहेत. महावितरणकडून उर्वरित वीज खरेदी केंद्रीय उपक्रम व अन्य खाजगी वीज उत्पादक यांचेकडून करण्यात येते. या सर्व स्त्रोतांकडून वीज खरेदी केल्यानंतर त्या खर्चात महावितरणचा संचलन-सुव्यवस्था खर्च (O&M), पारेषण व वितरण हानी (T&D Losses), प्रशासकीय खर्च यांचा अंतर्भाव होऊन महावितरणचा वीज दर ठरत असल्याने वीज दर वाढण्यात महावितरणच्या अखत्यारीतील याही बाबी कारणीभूत असतात.
- वीज खरेदी कराराचे (PPA) पावित्र्य पाळले जाणे ही महानिर्मितीसाठी महत्वाची बाब आहे. वीज खरेदीची दीर्घकालीन हमी दिल्यानंतरच महानिर्मितीने महावितरणची विजेची गरज भागविण्यासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात प्रकल्प हाती घेतले. या प्रकल्पामुळे महानिर्मितीला फार मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करणे व त्यापोटीचा आर्थिक भार सोसणे क्रमप्राप्त झाले.
- वस्तुतः महानिर्मितीने महावितरणशी **दि. ०१/०४/२००९ रोजी केलेल्या दीर्घकालीन वीज खरेदी करारातील (PPA) आर्टिकल क्र. ४-४.१ (अ) आणि (ब) अन्वये** महावितरणने महानिर्मितीची संपूर्ण १००% वीज खरेदी करणे कायद्याने बंधनकारक आहे. ही वीज नाकारण्याचा किंवा संच बंद ठेवायला सांगण्याबाबतचा कोणताही कायदेशीर अधिकार महावितरणला नाही. खरेदी केलेल्या विजेची विक्री, व्यापार, आदानप्रदान इ. संबंधीचे सर्व अधिकार मात्र महावितरणकडे आहेत. त्यामुळे महानिर्मितीचे काही संच बंद करण्याची महावितरणची मागणी वरील कराराचा भंग करणारी आहे.
- सदर PPA तील आर्टिकल क्र. ४.२.२ नुसार, अल्प मुदतीच्या तत्वावर महानिर्मितीला मात्र आपली वीज महावितरणशिवाय अन्यत्र विकण्याचा अधिकार आहे. पण तसे करताना महावितरणकडून वीजक्षमतेपोटीचे दर मिळविण्याचा अधिकारदेखील महानिर्मिती राखून आहे.
- खाजगी वीज उत्पादकांना अतिरिक्त वीज दर (Compensatory Tariff) आयात कोळशाचा वापर करुन झालेल्या वाढीव वीजनिर्मितीच्या (Incremental Generation) प्रमाणातच मंजूर करण्यात येईल, अशी वीज आयोगाची भूमिका आहे.

त्यानुसार, खाजगी विजेचा दर रु. ३.३९ ते रु. ३.९५ प्रति युनिट इतका वाढू शकतो व हा दर महानिर्मितीच्या बहुतांशी संचांच्या दरापेक्षा जास्त असेल.

- महानिर्मितीचा रु. ५००० कोटी इतका महसूल राखून ठेवण्याची महावितरणने केलेली मागणी सन्माननीय अपिलीय प्राधिकरण (Aptel) यांचा दि. १५/०२/२०१३ रोजीच्या निर्णयाशी ती विसंगत आहे. जर ही रक्कम नियामक मालमत्ता (Regulatory Asset) म्हणून घोषित करण्याचा प्रयत्न झाला तर खेळत्या भांडवलाच्या अभावापोटी महानिर्मितीच्या दैनंदिन वीजनिर्मितीला मोठा फटका बसून राज्यातील वीज परिस्थिती कधीही गंभीर होऊ शकते. अशा परिस्थितीत गंभीर आर्थिक समस्येमुळे आवश्यक किमान भागभांडवलापोटी महानिर्मितीचे वीज प्रकल्पदेखील रखडू शकतात.

- कोळसाटंचाईच्या पार्श्वभूमीवर चांगल्या स्थितीतील नव्या संचांना पुरेसा कोळसा मिळून वीजनिर्मिती वाढावी यासाठी महानिर्मितीने यापूर्वीच स्वतःहून वर्ष २०१४ मध्ये कोराडी, भुसावळ, व चंद्रपूर येथील काही जुने संच बंद ठेवण्याची परवानगी आयोगाकडे मागितली होती. ती मिळाल्यानंतर उर्वरित संचांच्या वीजनिर्मितीत वाढ करण्यात महानिर्मितीला यश देखील मिळाले आहे. त्यामुळे आगामी काळातही हे संच बंद ठेवण्याची परवानगी महानिर्मितीने आयोगाकडे मागितली आहे.

- राज्य वीज मंडळाच्या पुनर्रचनेनंतर तत्कालीन परिस्थितीत राज्यात तीव्र वीज टंचाई असताना आगामी विजेची मागणी ओळखून महानिर्मितीने परळी, पारस, भुसावळ व खापरखेडा येथील एकूण २५०० मेगावॅट क्षमतेचे औष्णिक वीज प्रकल्प पूर्ण केले. तसेच आगामी वर्षभरात कोराडी (१९८० मेगावॅट), चंद्रपूर (१००० मेगावॅट) व परळी (२५० मेगावॅट) हे प्रकल्पदेखील वीज निर्मिती करु लागतील. अशाप्रकारे आधीच्या ५० वर्षांत जेवढी औष्णिक स्थापित क्षमता होती ती जेमतेम ७-८ वर्षांत दुप्पटीने (एकूण सुमारे ६००० मेगावॅटने) वाढविण्याचे मोठे आव्हान महानिर्मितीने यशस्वीपणे पेललेले आहे.

- वीजनिर्मितीचा खर्च कमी व्हावा यासाठी महानिर्मितीने नव्याने स्वयंस्फूर्तीने काही सकारात्मक पावले उचलली आहेत. आगामी वर्षभरात विविध अंतर्गत सुधारणा साध्य करुन वीजनिर्मितीचा खर्च सुमारे ३५-५० पैशांनी कमी करण्याचे उद्दिष्ट महानिर्मितीने ठेवले असून त्याप्रमाणे कार्यवाहीदेखील सुरु आहे.

- वरील पार्श्वभूमीवर महावितरणच्या उपरोक्त दोन्ही मागण्या फेटाळून लावाव्यात अशी विनंती महानिर्मितीने वीज आयोगाला दिलेली आहे.

**********